# पुणे जिल्हा

## अवतीभवती



राजगुरुनगर (ता. खेड) : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते धनादेश स्वीकारताना शहाजी ठाकूर आणि मंगेश शिनगारे.

# खेड शिक्षण प्रसारक मंडळाची वेटलिफ्टिंगच्या खेळाडूंना मदत

राजगुरुनगर : पंजाबमधील पतियाळा येथे सुरू असलेल्या वेटलिफ्टिंगच्या राष्ट्रीय शिबिराकरिता निवड झालेल्या राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वैष्णव ठाकूर आणि सारिका शिनगारे या विद्यार्थिनींना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने प्रत्येकी २५ हजारांचे आर्थिक साहाय्य करण्यात आले. या खेळाडूंच्या पालकांकडे मदतीचे धनादेश नुकतेच देण्यात आले. यावेळी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर,प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, क्रीडाशिक्षक प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे आदी उपस्थित होते. शहाजी ठाकूर, मंगेश शिनगारे या पालकांनी धनादेशाचा स्वीकार केला. प्रा. प्रतिमा लोणारी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. तानाजी पिंगळे यांनी आभार मानले.